MHKO050000942012

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२२६/२०१२ मधील निशाण २५४ खालील आदेश</u>**

**चंद्रकांत महादेव नाईक (म.वा.)**
**वि.**
**कृष्णराव तात्यासो नाईक, वगैरे**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी वादी क्रमांक २ चंद्रकांत महादेव नाईक यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी असे कथन केले आहे की, वादी क्रमांक २ चंद्रकांत महादेव नाईक मयत झाले असून त्यांना श्रीमती शकुंतला चंद्रकांत नाईक व श्री महेश चंद्रकांत नाईक असे वारस आहेत. सबब, वारस रेकार्डवर घेण्यात येवून त्याप्रमाणे दुरुस्ती होणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी म्हणणे देवून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा हा वाटप व कायम मनाईसाठीचा आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १३/०१/२०२० रोजी दाखल केला असून वादी यांनी मयत वादी नं. २ चंद्रकांत महादेव नाईक यांचा मृत्यु दाखला प्रस्तुत कामात नि. २५७ सोबत दाखल केला आहे. त्यामुळे दावा अंतिमरित्या चालवून निकाली करण्यासाठी सर्व पक्षकार हे दाव्यात सामील असणे आवश्यक आहेत. त्यामुळे सर्व वारसांना पटलावर घेणे आवश्यक आहे. उलटपक्षी वारस अभिलेखावर घेतल्यामुळे दावा अंतिमरित्या चालवून निकाली होणेसाठी मदतच होणार आहे. वादी क्रमांक २ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब निशाणी २५३ वरील आदेशा प्रमाणे माफ करण्यात आला आहे. त्यामुळे वादी नं. २ यांचे वारस दाव्यात समाविष्ट करुन तशी दुरुस्ती करण्याची परवानगी वादीला देणे उचित ठरेल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. वादी यांचा अर्ज नि. २५४ मंजूर करण्यात येतो.

२.	वादी यांनी १४ दिवसांच्या आत वादी क्रं. २ चंद्रकांत महादेव नाईक यांचे वारसांना दाव्यात समाविष्ट करुन तशी दाव्यात दुरुस्ती करावी.

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2024.07.12 16:55:13 +0530

**इचलकरंजी**
**दिनांक–११/०७/२०२४**

**(संजय दि. वानखेडे)**
**४थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**इचलकरंजी.**